P S P S's

# INDIRA INSTITUTE OF PHARMACY

**A Report of "Special Residential of National Service Scheme"**

## फार्मसी कॉलेज साडवलीचे विशेष निवासी शिबिर

प्रबोधन शिक्षण प्रसारक संस्था, आंबव संचलित इंदिरा इंस्टीट्यूट ऑफ फार्मसी, साडवलीचे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत मा.श्री. रवींद्रजी माने यांच्या मार्गदर्शनाने पाटगाव येथे विशेष निवासी शिबिर नुकतेच पार पडले.

मुंबई विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाने दिलेल्या सुचनांचे पालन करत सदर शिबिर घेण्यात आले. सात दिवसांच्या या शिबिरासाठी देवरुख येथील पाटगावची निवड करण्यात आली. सदर शिबिरामध्ये बंधारे बांधणे, आरोग्य तपासणी शिबिरे, कापडी पिशव्यांचे वाटप, शोषखड्डे खणणे, गावचा सर्वेमार्फत आढावा, पथनाट्य, स्मशानभूमी आवारात वृक्षारोपणसाठी खड्डे खणणे आणी विविध विषयावरील व्याखाने अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पाटगाव गावच्या शिमगा आणि पालखी सोहळ्याच्या दिवशी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकानी एड्स जनजागृती, बेटी बचाओ, रस्ते सुरक्षा या विषयावर पथनाट्य सदर करून जनजागृती करत ग्रामस्थांची मने जिंकली. महाविद्यालयाने यावर्षी अतिशय साक्षमरीत्या हे शिबिर यशस्वीपणे पार पाडले. हे शिबिर यशस्वी करण्यात महाविद्यालयाचे प्रा. तन्मय पटवर्धन आणि प्रा. अंकिता बेर्डे यांनी विशेष मेहनत घेतली. सदर शिबिरासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाने रत्नागिरी जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. राहुल मराठे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल खाडे, पाटगावचे सरपंच, तलाठी, ग्रामसेवक आणि ग्रामस्थ यांचे मार्गदर्शन लाभले.

**Event Photographs**













NAAC Accredited